Gomantak Times 25/11/04

# साठ हजार परदेशी विद्यार्थ्यांना आकृष्ट करणार

## कुलगुरू परिषदेत संकल्प

वार्को, ता. २५ : विकसनशील आणि प्रगत देशांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी भारताकडे आकर्षित करण्याबाबत सर्व कुलगुरूंनी आज एकमत व्यक्त केले. पुढील तीन शैक्षणिक वर्षांत सुमारे साठ हजार परदेशी विद्यार्थ्यांना भारतात आणण्याचे उद्दिष्टही त्यांनी निश्चित केले.

'सकाळ' आणि विद्यापीठ अनुदान मंडळ यांनी आयोजिलेल्या कुलगुरू परिषदेच्या दुसऱ्या दिवशीच्या दुसऱ्या सत्रात आज उच्च शिक्षणाच्या निर्यातीबाबत चर्चा झाली. उच्च शिक्षणाच्या निर्यातीसाठी स्थापण्यात आलेल्या 'पायहेड' (प्रमोशन ऑफ इंडियन हायर एज्युकेशन ॲब्रॉड) या समितीच्या कार्याचा अहवालही या वेळी सादर करण्यात आला. 'यूजीसी'चे वित्त सल्लागार पवन आगरवाल, हैदराबाद विद्यापीठाचे कुलगुरू कोटा हरिनारायण, मद्रास विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. एस. पी. त्यागराजन आदींनी ही माहिती दिली.

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात परदेशी विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याची क्षमता भारताकडे आहे, असे नमूद करीत 'पायहेड'च्या प्रयत्नांची माहिती यावेळी देण्यात आली. अमेरिकेतील 'नाफसा' या शैक्षणिक संस्थेने आयोजिलेल्या प्रदर्शनात यंदा प्रथमच भारताने भाग घेतलेला. त्याला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे आणि 'यूजीसी'तर्फे काही करार करण्यात आल्याचे डॉ. पटवर्धन यांनी सांगितले. येत्या तीन वर्षांत प्रगत देशांतील सुमारे दहा हजार आणि विकसनशील देशांतील सुमारे

UGC
Vice Chancellors Meet

intel
Presents

सकाळ वृत्तपत्र समूह

पन्नास हजार विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचा संकल्प यावेळी सोडण्यात आला.

केनिया, टांझानिया आणि इथिओपिया या आफ्रिका देशांत 'यूजीसी'ने शिक्षण विषयक प्रदर्शन आयोजिले होते. त्यालाही उत्तम प्रतिसाद मिळाल्याचे श्री. आगरवाल यांनी सांगितले. सुमारे पाच हजार लोकांनी प्रदर्शनाला भेट दिल्याचे आणि बाराशे विद्यार्थ्यांनी भारतात शिक्षणासाठी नोंदणी केल्याचेही त्यांनी सांगितले.

विविध देशांत 'इंडिया एज्युकेशन' कार्यक्रम सुरू केल्याची माहिती यावेळी देण्यात आली. एसएनडीटी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. ए. जी. भालवणकर यांनीही नाफसा प्रदर्शनाची माहिती दिली. दूरशिक्षणाच्या बाबतीत 'यूजीसी'तर्फे होत असलेल्या प्रयत्नांचा आणि विविध विद्यापीठांकडून मिळत असलेल्या प्रतिसादाचा आढावा तिसऱ्या सत्रात घेण्यात आला. 'आयुका'तील प्रा. अजित केंभावी यांनी 'यूजीसी'द्वारे विविध विद्यापीठे व महाविद्यालयांना पुरविण्यात आलेल्या ब्रॉडबँड सुविधेची माहिती दिली. मात्र, त्याचा पुरेपूर वापर होत नसल्याचेही त्यांनी नमूद केले. विविध ग्रंथालये इंटरनेटने जोडणाऱ्या 'इनफ्लिबनेट' प्रकल्पाची माहिती टी. ए. व्ही. मूर्ती यांनी दिली. दूरशिक्षणासाठी साहित्य निर्मितीबद्दलचे (ई कंटेंट) अनुभवकथन डॉ. जी. डी. शर्मा यांनी केले.